# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

**जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/७०२ /२०२३-२४** **दिनांक :०७ /११/२०२३**

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **१) शांती प्लाझा बिल्डींग नं ३८ आणि ३९ को.ऑ.हौ.सो.लि.यांचे दि. १२/०९/२०२३ रोजीचे पत्र** | | | | | |
| १ | खाया | १५ ते २० फुट | ०१ | १५ वर्ष | सदरचे झाड शांती प्लाझा बिल्डींग नं ३८ आणि ३९ को.ऑ.हौ.सो.लि.बॅक ऑफ इंडीया समोर,शांती पार्क,मिरा रोड (पु.) येथिल सोसायटीच्या आवारात गेटच्या बाहेर झाड असून झाडाची मुळे खाली खोलवर पसरुन त्यामुळे सोसायटीची ड्रेनेज लाईन चौकप झालेली आहे त्यामुळे पाणी जाण्यास अडथळा निर्माण होत आहे तसेच झाड एका बाजुस झुकलेल्या अवस्थेत असून जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या कारणास्तव सदर झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| **२) मे.ओमेक्स कन्स्ट्रक्शन कंपनी बिल्डर्स आणि डेव्हलपर्स यांचे दि.१०/१०/२०२३ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | पिंपळ | १५ ते १८ फुट | ०१ | ०५ वर्ष | सदरचे झाड मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे भाईदर सर्वे क्र./ हिस्सा क्र.३६४/४ अ पै (जुना) ६७/४अ,७अ,नविन या जागेच्या इमारतीच्या गेटच्या समोर मनपा रोडवरील असून गेट मध्ये वाहने ये-जा करताना बाधित होत असून झाड पुर्न:रोपण करणे आवश्यक आहे. |
| **३) श्री ओसवाल बिल्डर्स लि.यांचे दि.०४/०९/२०२३ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | बॉटलपाम | २० ते २५ फुट | ०३ | १० वर्ष | सदरची झाडे मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे गोडदेव/ भाईदर येथिल सर्वे क्र./हिस्सा क्र.मौजे गोडदेव स.क्र.३६५ (जुना) ७१, (नविन) हि.क्र.६ पै, १२,१४ ते २० मौजे भाईदर, स.क्र. ३६४ (जुना) ६७ (नविन) हि.क्र.४ब. स.क्र.४८७ (जुना),८७ (नविन) हि.क्र.१ पै.५.६,७ व स.क्र. ४८८ (जुना) ८६ (नविन) हि.क्र.५ येथिल इमारत बांधकामात बाधित होत असून सदरची झाडे पुर्न:रोपण करणे आवश्यक आहे. |

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| ४) अस्मिता इंडीया लि.यांचे दि.१३/०६/२०२३ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | बकुळ | ०८ ते १० फुट | ०२ | ०४ वर्ष | सदरची झाडे एन.एल.शाळेच्या ग्राऊंड गेटसमोर मनपा रोड वरील झाडे बाधित होत असून सदरची झाडे बाजूला असलेल्या जागेत पुर्न:रोपण करणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**(योगेश गुणिजन)**
**सहाय्यक आयुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**